www.XtremePapers.com

UNIVERSITY OF CAMBRIDGE INTERNATIONAL EXAMINATIONS
General Certificate of Education Advanced Level

**MARATHI** **9688/02**

Paper 2 Reading and Writing **October/November 2011**

**1 hour 45 minutes**

Additional Materials: Answer Booklet/Paper

*2237770655*

**READ THESE INSTRUCTIONS FIRST**

If you have been given an Answer Booklet, follow the instructions on the front cover of the Booklet.
Write your Centre number, candidate number and name on all the work you hand in.
Write in dark blue or black pen.
Do not use staples, paper clips, highlighters, glue or correction fluid.

Answer **all** questions.
Write your answers in **Marathi** on the separate Answer Paper provided.
Dictionaries are **not** permitted.
You should keep to any word limits given in the questions.

At the end of the examination, fasten all your work securely together.
The number of marks is given in brackets [ ] at the end of each question or part question.

**सर्व प्रथम खालील सूचना वाचा.**

तुम्हाला उत्तरपुस्तिका दिली असल्यास तिच्या मुखपृष्ठावरील सूचनांचे पालन करा.

उत्तरपुस्तिका व पूरक उत्तरपृष्ठांवर तुमचा परीक्षा केंद्र क्रमांक, अनुक्रमांक (रोल नंबर) व तुमचे नाव लिहा.

गडद निळ्या अथवा काळ्या शाईच्या लेखणीने लिहावे.

टाचणी अथवा टाचण्याची कोणतीही अन्य साधने, वाक्यांना अधोरेखित करण्यासाठी रंगीत लेखणीचा वापर ,

डिंक किंवा चूक मजकूर खोडण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या शाईचा वापर करू नये.

**सर्व** प्रश्न सोडवा.

उत्तर लिहिण्यासाठी देण्यात आलेल्या वेगळ्या पृष्ठांवर प्रश्नांची उत्तरे **मराठीत** लिहा.

शब्दकोषांचा उपयोग करण्यास मनाई आहे.

प्रश्नात नमूद केलेल्या शब्दसंख्येच्या मर्यादेत उत्तर लिहावे.

परीक्षेच्या शेवटी उत्तरांची सर्व पृष्ठे व्यवस्थित बांधावीत.

प्रत्येक प्रश्नाच्या शेवटी अथवा पोट प्रश्नांच्या शेवटी कंसात [ ] प्रश्नांचे गुण दिले आहेत.

This document consists of **5** printed pages and **3** blank pages.

DC (NF/AD) 31715/2
© UCLES 2011

UNIVERSITY *of* CAMBRIDGE
International Examinations

## विभाग – 1

**सर्वप्रथम पुढील गद्य उतारा काळजीपूर्वक वाचा व त्यानंतर त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.**

जागतिकीकरणाने माध्यमांतील नीतीमूल्ये बदलून टाकली आहेत. जागतिकीकरणाने माध्यमांवर नव्हे, तर माणसांच्या आयुष्यावरही व्यापक परिणामाला सुरूवात केली आहे. हे सर्व परिणाम वाईटच आहेत असे मानण्याचे मात्र कारण नाही. कारण जागतिकीकरणाची प्रक्रिया म्हणजे एकमार्गी वाहतूक नसून ती दुहेरी स्वरूपाची आहे. जागतिकीकरणाने समाजाच्या विविध प्रवाहांमध्ये स्वागतार्ह अशी वस्तुनिष्ठता आणण्याचे काम केले आहे.

'थिंक ग्लोबली ॲक्ट लोकली' हे जागतिकीकरणाचं खरं सूत्र आहे. सरतेशेवटी ज्या ज्या गोष्टी ग्लोबली महत्त्वाच्या आहेत त्यांची अंमलबजावणी किंवा त्यांचे अस्तित्व हे 'लोकली' प्रकट होणे महत्त्वाचे आहे. जागतिकीकरणाचा विचार मिडीयाच्या संदर्भात करताना काय दिसते? मिडिया ग्लोबल झाला म्हणजे नेमके काय झाले? तर अगदी गावपातळीवरचे वृत्तपत्र किंवा वाहिन्या जगभरात कुठेही दिसण्याची किंवा वाचण्याची संधी उपलब्ध झाली. परंतु प्रसारमाध्यमांबद्दलची ही जागतिक पातळीवरची जागृती जोपर्यंत बहुतांशी सर्वसामान्य जनतेपर्यंत पोचत नाही तोपर्यंत मिडीया ग्लोबल झाला असे म्हणणे धाडसाचेच ठरेल. माध्यमांचे प्रमुख काम जनतेला महत्त्वाच्या लोकहितकारी प्रश्नांबद्दल जनजागृती करणे, जनशिक्षण देणे, एखाद्या विषयावर मत तयार करणे असे 'वॉच डॉग'चे असते. मुळातून वृत्तपत्रांची निर्मिती हीच जनतेला माहिती देण्याच्या वृत्तीतून निर्माण झाली आहे.

आज मिडीया ग्लोबल झाला म्हटले तर जगभराची अनेकांगी माहिती सर्वदूर पसरली आहे असे गृहित धरले जाते. अमेरिकेसारख्या महासत्तेतील जनता उपलब्ध माहितीच्या स्फोटामुळे अतिशय 'वेल–रेड' आहे असे समजू या. आणि प्रत्यक्षात काय आढळून येत आहे? अमेरिकेत 'हू सेज अमेरिकन्स आर स्टुपिड?' सारखे कार्यक्रम वाहिन्यांवर प्रसारित होतात तेव्हा त्यातील सामान्य अमेरिकन माणसाचे सामान्यज्ञान बघून भोवळ यायचीच शिल्लक राहते. न्यूयॉर्कच्या फुटपाथवरून नोकरीसाठी घाईघाईने जाणाऱ्या अमेरिकन माणसाला जेव्हा विचारले की 'हू इज टोनी ब्लेअर?' तेव्हा त्याने खूप विचार करून, ''हा, टोनी ब्लेअर म्हणजे आत्ता तो नवा चित्रपट रिलीज झाला आहे त्याचा अगदी नवा नायक ना? येस! करेक्ट!'' आणि खरे तर टोनी ब्लेअर हे त्या राष्ट्राचे अगदी लाडके मित्र आहेत. तरी टोनी ब्लेअर हा सामान्य अमेरिकन माणसाला माहीत नाही? म्हणजे माध्यमे शिक्षण द्यायला कमी पडताहेत की सामान्य प्रेक्षक–वाचक त्याचा उपयोग करण्यात मागे राहिला आहे? याचाच अर्थ मिडीया नुसता ग्लोबल असून उपयोग नाही तर तो कितीजणांपर्यंत कसा पोचतोय हे सर्वात महत्त्वाचे आहे.

मिडीया ग्लोबली दिसणे यालाच आपण जर ग्लोबल मिडीया म्हणत असू तर हा उद्देश पूर्ण झाला आहे आणि हे देखील महत्त्वाचेच आहे. अन्यथा वर्ल्ड ट्रेड सेंटरवरचा हल्ला, मुंबईवरचा हल्ला अशा गोष्टी जागतिक पातळीवर चर्चेच्या ठरल्या नसत्या आणि इतक्या गंभीर घटनांचे पडसाद न उमटल्याने त्यावर उपाययोजना करणेही कठीण गेले असते. परंतु या घटना ज्या प्रमाणात 'बातमी' म्हणून सर्वदूर पोचल्या त्या प्रमाणात त्याविषयीचे 'प्रभावी जनमत' तयार करण्यात मिडीया यशस्वी झालेला दिसत नाही. या गोष्टीचा विचार करणे आवश्यक आहे.

1 **पुढील शब्द वरील उताऱ्यातील असून त्यांच्या विरूद्ध अर्थाचे शब्द लिहून त्या शब्दांचा वाक्यात उपयोग करा.**

**(i)** कठीण [1]

**(ii)** सामान्य [1]

**(iii)** ज्ञान [1]

**(iv)** धाडस [1]

**(v)** नवा [1]

2 **खाली दिलेले वाक्यप्रयोग अचूकपणे स्पष्ट करणारे शब्द वरील उताऱ्यातून शोधून लिहा.**
**उदाहरणार्थ – सर्वसामान्य जनतेच्या प्रबोधनाची प्रक्रिया**
**उत्तर – जनशिक्षण**

**(i)** लोकांचे हित ज्यात आहे अशा गोष्टी [1]

**(ii)** जनतेचे विविध विषयांवरील प्रबोधन [1]

**(iii)** संपूर्ण जगात श्रेष्ठ ठरणारा देश [1]

**(iv)** विभिन्न अंगे असलेली [1]

**(v)** स्वागत करण्यायोग्य व स्वीकार्य बाब [1]

3 **पुढील प्रश्नांची मराठीत उत्तरे लिहा. उत्तरे स्वतःच्या शब्दात लिहिलेली असावीत. उताऱ्यातील वाक्यांचे अनुकरण उत्तरात नसावे. अन्यथा गुण कमी होतील. प्रत्येक प्रश्नाच्या शेवटी गुण दिले आहेत. भाषेच्या गुणवत्तेसाठी अतिरिक्त 5 गुण आहेत. एकूण गुण 15 + 5 = 20**

**(i)** जागतिकीकरणाच्या प्रभावाची प्रक्रिया कशा स्वरूपाची आहे ? [2]

**(ii)** माध्यमांचे प्रमुख कार्य कोणते आहे ? [2]

**(iii)** मिडीया खऱ्या अर्थाने ग्लोबल केव्हा होईल ? [3]

**(iv)** सर्वसामान्य अमेरिकन माणसाच्या सामान्यज्ञानाबद्दल कोणता अनुभव उताऱ्यात व्यक्त केलेला आहे ? [3]

**(v)** माध्यमांनी कोणत्या महत्त्वपूर्ण गोष्टी साध्य केल्या आहेत ? [2]

**(vi)** वरील उताऱ्याचा सारांश तीन वाक्यांतून यथोचितपणे अभिव्यक्त करा. [3]

**एकूण गुण** [20]

## विभाग – 2

**सर्वप्रथम पुढील गद्य उतारा काळजीपूर्वक वाचा व त्यानंतर त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.**

जागतिकीकरणाच्या लाटेमुळे आणि पाश्चिमात्य चंगळवादाच्या वाढत्या प्रभावामुळे भारतीय समाजाच्या सर्व धारणा बदलत गेल्या आणि त्यामुळेच वृत्तपत्रांच्याही भूमिका बदलत गेल्या. लोकप्रबोधनाऐवजी लोकानुरंजनाला अधिक महत्त्व देण्यात येऊ लागले. संपादक मंडळीही स्वतःचे असे समाधान करून घेऊ लागली की आमच्या वाचकाला जे हवे आहे ते त्याला देत आहोत. अशा संपादकांकडून लोकप्रबोधनाची आबाळ होणे सुरू झाले. वृत्तपत्र हे फक्त क्षणभर मनोरंजन होईल असे अर्धनग्न फोटो छापण्याचे एक माध्यम झाले. लोकानुरंजन करायचे म्हणून गंभीर विषय वाळीत टाकले गेले. वृत्तपत्रांना आपल्या जबाबदारीचा विसर पडला आणि जनतेला भुलविण्याचा उद्योग सुरू झाला. या लोकानुरंजनाचा आश्रय घेतल्याने खपाची संख्या झपाट्याने वाढली, त्यामुळे जाहिरातीही येऊ लागल्या, पण ज्यासाठी म्हणून वृत्तपत्र काढले होते त्याचे काय? हा प्रश्न कायम राहिला. वास्तविक पाहता वृत्तपत्राच्या दृष्टीने विश्वासार्हता ही महत्त्वाची बाब असते. वृत्तपत्रात छापून आले म्हणजे ते शंभर टक्के खरे आहे असे आज 21व्या शतकातही भारतीय जनता मानत आहे.

या विश्वासार्हतेला मोठा तडा बसला तो भारतात इलेक्ट्रॉनिक माध्यमांचा उदय झाल्यावर. वृत्तपत्राला बातमी जनतेपर्यंत पोचविण्यासाठी 24 तास मिळत. त्यामुळे त्या वारंवार तपासणे, अद्यावत करणे, चुकीचा तपशील काढून टाकणे हे शक्य होत असे. पण इलेक्ट्रॉनिक माध्यमांसमोर वेळेचे मोठे आव्हान होते. कोण सर्वात पहिले बातमी देतो या स्पर्धेने सर्वांना भारले होते. मुंबईला ताज हॉटेलसमोर बॉम्बस्फोट झाला त्याची बातमी या माध्यमाने अशीच स्पर्धेतून फुगवली होती.

जनमानसावर वाहिन्यांचा वाढता प्रभाव हा चिंताजनक आहे. या वाहिन्यांनी जे निकष पाळायला पाहिजेत त्याच्याशी कुणाचेही काहीएक देणेघेणे उरले नाही. सतत बातमी देणे, जलद गतीने बातमी देणे या हव्यासापोटी 24–24 तास चालणारी वार्तापत्रे सुरू झाली. मग कंदाहारसारखे अपहरण–प्रकरण असो किंवा संसदेवर हल्ला होण्याची गंभीर घटना असो, आम्ही त्या सर्वाचे गांभीर्य आणि मूळ अधिष्ठानच गमावून बसलो. पतनाचा हा प्रवास फक्त विश्वासार्हतेशी काडीमोड घेऊनच थांबला नाही तर आरोपित व्यक्तींची मिडीया ट्रायल सारखे प्रकार सुरू झाले. पत्रकारितेची जी मूलभूत तत्त्वे आहेत त्यापासून आम्ही केव्हा बाजुला झालो हेच आम्हाला उमगले नाही. देशहिताचा विचार करण्याऐवजी माध्यमे टीआरपीचा विचार करू लागली. 26 / 11 चा मुंबईवरील हल्ल्याचा प्रसंग घ्या. सतत दाखविणे, 24 तास दाखविणे यात आमच्या देशहिताला दुयम स्थान दिले.

एवढया मोठया प्रमाणावर दर्जाची घसरण झाली असतानाही जनमानसात असणारे मिडीयाचे स्थान अजूनही अबाधित आहे. याही माध्यमामध्ये परिपक्वता येत जाईल तसतशी घाईगर्दीची व धावपळीची जागा विवेक घेईल. काय दाखवावे आणि काय दाखवू नये याचे तारतम्य काळानुरूप भारतातल्या माध्यमांनाही येईल. अमेरिकेमध्ये 9 / 11 झाले. या घटनेमध्ये कोणीच मृत पावले नसेल का? पण कुठल्याही मिडीयाने तसा एकही फोटो जगासमोर येऊ दिला नाही. त्या सगळयांच्या दृष्टीने वाहिन्यांच्या कथित लोकप्रियतेपेक्षा देशहित महत्त्वाचे होते. तसाच भाव भारतातही निश्चित येईल. तो काळ फारसा दूर नाही.

© UCLES 2011

4 **पुढील प्रश्नांची उत्तरे मराठीत लिहा. उत्तरे स्वतःच्या शब्दात लिहावीत. वरील उताऱ्यातील वाक्ये उत्तरात नसावीत. अन्यथा गुण कमी केले जातील.**
**प्रत्येक प्रश्नाच्या शेवटी गुण दिले आहेत. भाषेच्या गुणवत्तेसाठी अतिरिक्त 5 गुण आहेत.**
**एकूण गुण 15 + 5 = 20**

**(i)** जागतिकीकरणाचा कोणता प्रभाव भारतीय वृत्तपत्रसृष्टीवर पडला ? [2]

**(ii)** भारतीय माध्यमांच्या विश्वासार्हतेला केव्हा व कसा तडा बसला ? [3]

**(iii)** पत्रकारितेच्या मुलभूत तत्त्वांपासून माध्यमे कशाप्रकारे दूर गेली ? [4]

**(iv)** भारतीय माध्यमांबाबत कोणता आशावाद वरील उताऱ्यात व्यक्त करण्यात आला आहे ? [3]

**(v)** माध्यमांनी देशहिताला वाळीत टाकण्याचे प्रकार कसे घडले ? [3]

**एकूण गुण** [20]

5 **पुढील प्रश्नांची उत्तरे मराठीत लिहा. दोन्ही प्रश्नांच्या उत्तरातील एकूण शब्दसंख्या 140 पर्यंत असावी. उत्तरे स्वतःच्या शब्दात लिहावीत. वरील उताऱ्यातील वाक्ये उत्तरात नसावीत. अन्यथा गुण कमी केले जातील.**
**प्रत्येक प्रश्नाच्या शेवटी गुण दिले आहेत. भाषेच्या गुणवत्तेसाठी अतिरिक्त 5 गुण आहेत.**
**एकूण गुण 15 + 5 = 20**

**(i)** वरील दोन्ही उताऱ्यांच्या आधारे 'जागतिकीकरणाचा माध्यमांवर झालेला प्रभाव' या विषयावर एक टिपण लिहा. [10]

**(ii)** मॉरिशसमधील माध्यमजगताची सध्याची स्थितिगती तुमच्या शब्दांत वर्णन करा. [5]

**एकूण गुण** [20]

© UCLES 2011 

**BLANK PAGE**

**BLANK PAGE**

© UCLES 2011

**BLANK PAGE**

Permission to reproduce items where third-party owned material protected by copyright is included has been sought and cleared where possible. Every reasonable effort has been made by the publisher (UCLES) to trace copyright holders, but if any items requiring clearance have unwittingly been included, the publisher will be pleased to make amends at the earliest possible opportunity.

University of Cambridge International Examinations is part of the Cambridge Assessment Group. Cambridge Assessment is the brand name of University of Cambridge Local Examinations Syndicate (UCLES), which is itself a department of the University of Cambridge.

© UCLES 2011